


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ५ डिसेंबर २०२४ | अंक ३६१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# फडणवीसांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वीच जरांगे पाटलांनी आपल्या आंदोलनाची दिशा ठरवली

**देवेंद्र फडणवीस हे आज तिसऱ्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर घडामोर्डींना वेग आला असून, यावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं**

देवेंद्र फडणवीस हे उद्या तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. मुंबईच्या आझाद मैदानात हा शपथविधी सोहळा होणार आहे. या शपथविधीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार आहेत. या शपथविधी सोहळ्याला तब्बल २२ राज्यातील मुख्यमंत्री देखील हजर राहणार आहेत. दरम्यान या शपथविधी सोहळ्यापूर्वी अंतरवाली सराटीमधून मोठी बातमी समोर येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या आहेत, सोबतच इशारा देखील दिला आहे काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील हे तुळजापूर दौऱ्यावर



असताना त्यांनी आता आपण मराठा आरक्षणासाठी सामूहिक आमरण उपोषण सुरू करणार असल्याचं म्हटलं होतं. हे आंदोलन मुंबईच्या आझाद मैदानात होईल किंवा अंतरवालीमध्ये होईल असं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान त्यांनी आता या संदर्भातील आपली दिशा स्पष्ट केली आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर आपण सामूहिक आमरण उपोषण करणार असून, मरेपर्यंत हे आंदोलन सुरू राहील हीच आंदोलनाची पुढची दिशा असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.आंतरवाली सराटीमध्येच सामूहिक आमरण उपोषण होणार आणि ते खूप भव्य दिव्य होणार. असं आंदोलन कोणीही बघितलं नसेल असं ते सामूहिक आमरण उपोषण होईल. मात्र आरक्षण घेतल्याशिवाय मी कोणालाही सोडणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

शुभेच्छा द्यायला ते काही आमचे शत्रू नाहीत, त्यामुळे त्यांचे अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देखील देतो. महाराष्ट्रात आमची संस्कृती आहे. आम्ही विरोध पण करतो आणि मोठ्या मनाने शुभेच्छा देखील देतो, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. सोबतच मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय सुट्टी नाही, असा इशारा देखील यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी आपल्या आंदोलनाबाबत मोठी घोषणा केली आहे.

# एल् वॉर्ड स्तरीय विज्ञान प्रदर्शनातील चांद्रयान उद्घाटन प्रकल्प..



५२ वे विज्ञान प्रदर्शन विवेकानंद हायस्कूल या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते .

समाजासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाला अनुसरून चांद्रयान तीन चा लाईव्ह प्रकल्प गांधी बालमंदिर हायस्कूल येथील श्री अवधूत चव्हाण सर ,अमोल जागळे सर, घनश्याम जोशी सर यांनी यशस्वी सादर केला.

प्रकल्पाचे उद्घाटन शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग चे

प्रमुख डॉक्टर मुस्ताक शेख यांनी केले .यावेळी वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, कुर्ला विभागाचे आमदार श्री मंगेश कुडाळकर साहेब असे मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी श्री विश्वनाथ पांचाळ सर , रत्नकांत विचारे सर व पालक कविता केसरकर यांनी सुंदर रांगोळी काढली.या वेळी रुपेश नकाशे सर ,इतर मान्यवर शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सदर प्रकल्पाला मार्गदर्शन,प्रोत्साहन शाळेचे मुख्याध्यापक श्री.अनिल पांचाळ सर यांनी केले होते. या प्रदर्शनासाठी विवेकानंद हायस्कूल शाळेच्या मुख्याध्यापिका गीता मॅडम यांनी खूप मेहनत घेतली आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पत्रकारांचे आरोग्य शिबीर संपन्न

प्रतिनिधी । बीड

दि.४ : देशातील पत्रकारांची सर्वात मोठी आणि सर्वात जुनी पत्रकार संघटना असलेली मराठी पत्रकार परिषद ८६ व्या वर्धापनदिनानिमित्त मराठी पत्रकार परिषदेचे विश्वत एस.एम. देशमुख, बीड जिल्हाध्यक्ष विशाल सांळुखे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पत्रकारांचे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे मोफत आरोग्य तपासणी, इसीजी, रक्त तपासणी, दंत चिकित्सा, डायबीटीस तपासणी, शिबीरात करण्यात आली. या शिबीराचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक अभिषेक जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. तांदळे, डॉ. ओमासे, जेष्ठ पत्रकार इद्रीस चाऊस, दयानंद

सोनवणे, एल. आर जाधव, मराठी पत्रकार परिषदे हल्ला कृती समिती अध्यक्ष संजय सानप, सचिन पवार, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. सोमनाथ खंडागळे, सचिव हम ीदखान पठाण, उपाध्यक्ष






जावेद शेख, अशोक भवर, अनिल गायकवाड, शहराध्यक्ष फय्याज सय्यद, कोषाध्यक्ष दत्ता देशमाने, नाना डिडुळ, सतिश गर्जे, पदाधिकारी, सदस्य, नागरिक आदी उपस्थित होते.

# शपथविधीसाठी नारायणगडचे महंत शिवाजी महाराज निमंत्रित



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांना उद्या दि.५ डिसेंबर रोजीच्या मुंबई येथील आझाद मैदानावर होणा-या राज्य सरकारच्या शपथविधी सोहळ्याचे विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. अनेक विध पंथ, संप्रदाय, संघटना, संस्था, साधू,संत, महंत, यांना शपथ विधी साठी निमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र ातील धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी ह.भ.प.शिवाजी महाराज उपस्थित राहणार आहेत.

# केज मतदारसंघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कामे प्रगतीपथावर

**आ.नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नाने शेतीसाठी आता दिवसाही होणार वीजपुरवठा**

अंबाजोगाई शेतीला केवळ रात्री वीज पुरवठा होत असल्याने हवालदिल झालेल्या केज विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे. मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कामे प्रगतीपथावर असून त्यामुळे शेती पंपासाठी दिवसाही वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिकाधिक उपकेंद्रांचा समावेश या योजनेत करण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी नियमित पाठपुरावा सुरु ठेवला होता. सध्या शेतीला रात्री वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. या पार्श्वभूमीवर, शेतीला दिवसा किमान आठ तास वीज मिळावी या हेतूने आ. नमिता मुंदडा यांनी मतदार संघातील कृषीबहुल भागातील अकरा विद्युत उपकेंद्राचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत समावेश करून घेतला. या योजनेतील कामे आता प्रगतीपथावर सरू आहेत. त्यापैकी मस्साजोग, विडा, बनसारोळा, माळेगाव, राजेगाव, बाघुळगाव (सर्व ता.केज) या ३३ के.ही उपकेंद्रात अतिरिक्त ५ एमव्ही चे रोहित्र बसविले जाणार असून सौरउर्जेचा वापर करून शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यात येईल. योजनेत मंजूर झालेल्या उर्वरित ३३ के.व्ही. उपक्रकेंद्रातील पॉवर ट्रॉन्सफोर्मर बसविण्याचे काम दोन महिन्यात पूर्ण होईल. त्यानंतर सौर पॅनलचे काम करण्यात येईल. यासोबतच आपेगाव, कुंबेफळ (ता. अंबाजोगाई), आडस, केज, धनेगाव (ता. केज) या ३३ के.व्ही. उपकेंद्रातील दुरूस्ती कामे करण्यात येणार आहेत. सदरील कामे पूर्णत्वास गेल्यानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर करून त्यांना दिलासा दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.



# जिल्ह्याला लागलेला ऊसतोड मजुरांचा डाग पुसण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांना मंत्री करा- नगराध्यक्ष राजु जाधव

पाटोदा (प्रतिनिधी) जातीपातीच्या राजकारणाला कधीही थरा न देणारे सर्व जाती धर्मातील सामान्य माणसाच्या नेहमी सुखदुःखात धाऊन जाणारे महायुतीचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस यांनी आष्टी विधान सभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य अशा प्रचंड मतांनी निवडून येऊन महाराष्ट्र राज्यातील जनतेची मन जिंकली आहे त्यामुळे पक्षश्रेष्टींनी जाती पातीच्या राजकारणाला थरा न देता



आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात ऐतिहासिक विजय मिळवनार्या आमदार सुरेश आण्णा धस यांना पक्षश्रेष्टींनी महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्यावा अशी म ागणी नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी केली..

# चतुररागिनी ग्रुपचा सितारों की मेहफिल हा पंचवार्षिक महोत्सव हर्ष उल्हासात संपन्न

मुंबई(प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणारा चतुररागिनी हा ग्रुप.या ग्रुपच्या माध्यमातून नुकताच कस्तुरबा हॉल,माटुंगा पश्चिम येथेङ्गसितारों की मेहफिल ङ्गहा पंचवार्षिक महोत्सव मोठ्या हर्ष उल्हासात आणि धुमधडाक्यात पार पडला.चतुररागिनी या ग्रुपच्या माध्यमातून पार पडलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना मुकुट आणि विजयचिन्ह देऊन गौरविण्यात आले.चतुररागिनी ग्रुप च्या अध्यक्षा सौ.शिल्पा देसाई व त्यांच्या टीमने या कार्यक्रमाची फार सुंदररित्या आखणी केली होती.उपस्थित असलेल्या चतुररागिंनी वेगवेगळ्या चित्रपट कलाकारांसारखे हुबेहुब पोशाख करुन त्यांच्या सुपरहिट गाण्यांवर ज्याप्रकारे नृत्य सादर केली की जणू सगळे फिल्मी कलाकारच स्टेजवर अवतरले आहेत.आणि ह्या सगळ्यात लक्षवेधी झाला तो म्हणजे फॅशनवॉक खूपच सुंदररित्या सादर केला त्यामुळे चित्रपट तारिकांच्या आठवणींना उजाळा मिळाला.पण हे करताना चतुररागिनींनी आलेल्या सगळ्यांचे मनोरंजन ही केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय व संजना राणे ह्या जोडीने उत्कृष्टरित्या सांभाळले,सोबतच ह्या जोडीच्या नृत्याने व इतर चतुररागिनींच्या दिलखेचक नृत्य अदाकारीने कार्यक्रमाची रंगत वाढली.जेणेकरून सितारोकी मेहफिल हे नाव पूर्णपणे सार्थकी ठरले.मराठी सिनेतारका,निवेदिका सेलेब्रेटी पूनम चांदोरकर यांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती तर लावल

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

# बाबा आढावांनी, उपोषण सोडल

येष्ठ समाजवादी नेते बाबा आढाव यांनी लोकशाही वाचविण्यासाठी आत्मक्लेष म्हणून पुण्यात तीन दिवसांचे उपोषण केले, तेव्हा महाराष्ट्रातील जनतेला हळहळ जरूर वाटली. असे बाबांनी करायला नको होते, अशीच सर्वसामान्य जनतेत भावना होती. बाबांचे वय ९५ आहे. बाबा हे गोरगरीब जनतेचे आदर्श नेते आहेत. कामगार, मजूर, उपेक्षित जनतेचा आधार म्हणून बाबांकडे पाहिले जाते. गोरगरिबांना दोन घास सुखाने व हक्काने मिळावेत म्हणून, आजवर बाबांनी त्यांच्या जीवनात शेकडो आंदोलने केली. पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने जो कौल दिला, तो बाबांना पसंत पडला नसावा. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महाआघाडीचे ३१ खासदार निवडून दिले आणि महायुतीचे केवळ १७ खासदार लोकसभेवर पाठवले. या निवडणुकीत मतदारांनी भाजपाचे केवळ ९ खासदार विजयी केले व त्या पक्षावर आपला राग व्यक्त केला. मग त्याच भाजपाचे विधानसभा निवडणुकीत १३२ आमदार कसे निवडून येतात, भाजपाप्रणीत महायुतीचे २३५ आमदार कसे विजयी होतात, या प्रश्नाने अनेकांना भंडावले आहे तसेच बाबा आढावांनाही अस्वस्थ केले असावे. बाबा हे कट्टर समाजवादी विचारसरणीचे आहेत. त्यांनी आपले विचार कधी बदलले नाहीत. सत्ता बदलली म्हणून बाबांनी कधी आपल्या निष्ठा बदलल्या नाहीत. लढाऊ समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस हे भाजपाप्रणीत एनडीए सरकारमध्ये सामील झाले होते. ते वाजपेयी यांच्या सरकारमध्ये संरक्षणमंत्री होते, एवढेच नव्हे तर एनडीएचे निमंत्रक म्हणून त्यांनी काम पाहिले. जॉर्ज यांनी कधी भाजपावर जातीयवादी म्हणून टीका केली नाही किंवा हिंदुत्ववादी म्हणून भाजपाची हेटाळणी केली नाही. एनडीएच्या काळात तर संकटमोचक हनुमानाच्या भूमिकेत ते मित्रपक्षांच्या नेत्यांचे रुसवे-फुगवे काढत असत. समता, ममता आणि जयललिता यांना संभाळून एनडीए सरकार चालविणे ही मोठी कसरत होती. पण निमंत्रक म्हणून समाजवादी विचारांचे जॉर्ज फर्नांडिस शांतीदूत म्हणून काम करीत असत. नितीशकुमार हेसुद्धा समाजवादी विचारांचे नेते. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातून मोठे झालेले नेते. ते अनेक वर्षे एनडीएमध्ये आहेत. मध्यंतरी ते काँग्रेस व लालू यादव यांच्यासोबत गेले होते; पण नंतर त्यांना पश्चात्ताप झाला व हे समाजवादी वीर पुन्हा मोदी-शहांच्या नेतृत्वाने प्रभावित होऊन एनडीएमध्ये आले. भाजपानेही त्यांच्या पक्षाचे आमदार कमी असूनही त्यांना मुख्यमंत्रीपदावर कायम ठेवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिहारमध्ये येऊ नका असे २०१४च्या लोकसभा निवडणुकीत सांगणारे नितीशकुमार आता जाहीर सभांतून त्यांना वाकून वंदन करतात. आपण एनडीए सोडून जाणार नाही, याची ग्वाही देतात. महाराष्ट्रात १९७८ मध्ये शरद पवारांनी स्थापन केलेल्या पुलोदमध्ये काँग्रेस, समाजवादी, तेव्हाचा जनसंघ, शेका पक्ष, डावे पक्ष सहभागी झाले होते. सरकारमध्ये अडीच वर्षे समाजवादी जनसंघाबरोबर आनंदाने नांदत होते. तेव्हा बाबांना काहीच खटकले नव्हते. आजही उत्तर प्रदेशात अखिलेश यादव व बिहारमध्ये लालू यादव व त्यांचे पुत्र समाजवादी विचाराची ढाल पुढे करून मुस्लिमांची व्होट बँक संघटित कशी राहील याची दक्षता घेत आहेत. दोन्ही समाजवादी नेते हिंदू विरोधी राजकारण खेळत आहेत. राम मंदिराला विरोध म्हणजे लोकशाही वाचविणे असा त्यांचा अजेंडा आहे. मुस्लीम व्होट बँक आणि भाजपाविरोध या दोन मुद्द्यांवर ते आपला पक्ष रेटताना दिसत आहेत. केवळ भाजपा व हिंदू विरोध म्हणजे समाजवादी विचार का? बाबा आढावांनासुद्धा विधानसभेच्या निकालानंतर लोकशाही धोक्यात आली असे अचानक कसे वाटू लागले? लोकशाही वाचविण्यासाठी ते आत्मक्लेष करून घेण्याच्या विचारापर्यंत का गेले, हे सर्व अनाकलनीय आहे. बाबा आढावांसारखी अनुभवसंपन्न व वैचारिक बांधिलकी असलेली व्यक्तिमत्त्वे फारच थोडी आहेत. त्यांना पुरेशी माहिती न दिल्यामुळे ते लोकशाही वाचविण्यासाठी रस्त्यावर उतरले असावेत. विधानसभेच्या निकालानंतर मतदानाची टक्केवारी अचानक कशी वाढली, भाजपाचे उमेदवार प्रचंड मताधिक्याने कसे निवडून आले, राज्यात महायुतीच्या विरोधात वातावरण असताना महायुतीला अभूतपूर्व यश कसे मिळाले? अशा प्रश्नांनी महाआघाडीने राज्यात काहूर उठवले आहे. पण लाडकी बहीण व ओबीसी या दोन मोठ्या व्होट बँका महायुतीकडे एकजुटीने विधानसभा निवडणुकीत वळाल्या, हे कोणी समजून घ्यायला तयार नाही. ईव्हीएम नको, मतपत्रिका पुन्हा आणा अशी मोहीम महाआघाडीतील घटक पक्षांनी जोरदार सुरू केली आहे. ईव्हीएम मशीन काय भाजपाने आणले आहे काय? लोकसभा निवडणुकीत महाआघाडीला या ईव्हीएमने भरघोस यश दिले तेव्हा ईव्हीएम चांगले होते. आता विधानसभा निवडणुकीत महाघाडीचे पानिपत झाले तेव्हा ईव्हीएम एकदम वाईट ठरवले जाऊ लागले. बाबा आढाव यांनी सार्वजनिक जीवनात सर्वाधिक लढे हे काँग्रेस सत्तेवर असताना दिले. त्याच काँग्रेसचा विधानसभेत दारुण पराभव झाला म्हणेज लोकशाहीचा पराभव झाला असा समज कोणी बाबांना करून दिला आहे का? १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार होते, त्याच काँग्रेस सरकारने देशावर आणीबाणी लादली होती, विरोधी पक्षांचे सर्व लहान-मोठे नेते तुरुंगात डांबले होते. स्वत: बाबा आढाव यांनाही काँग्रेस सरकारने जेलमध्ये टाकले होते. तेव्हा काँग्रेसने आणीबाणीच्या माध्यमातून संविधानावर व लोकशाहीवर घाला घातला.

# विधीमंडळ नेत्यांची निवड

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची मतमोजणी २३ नोव्हेंबरास झाली. त्यास ३ डिसेंबरास दहा दिवस पूर्ण झाले. या मतमोजणीनंतरच्या आकड्यांमध्ये संदिग्ध असे काहीही नव्हते आणि सत्ताधाऱ्यांस मिळालेले दणदणीत बहुमत सर्व काही स्पष्ट करणारे होते. पण दहा दिवसांनंतरही सरकार स्थापनेसाठी म्हणून ज्या काही घडामोडी होतात, त्या झालेल्या नाहीत. आज बुधवारी- ४ डिसेंबर रोजी भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक संपन्न झाली आणि त्यात त्या पक्षाचा विधिमंडळ नेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. म्हणजे त्यानंतर एकनाथ शिंदे-चलित शिवसेना, अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी आणि भाजप या तिघांची संयुक्त बैठक होईल आणि महायुतीचा विधिमंडळ नेता निवडला जाईल. मुख्यमंत्रीपद त्याच्याकडे जाईल. त्यानंतर हे मुख्यमंत्री राज्यपालांस भेटून सत्तास्थापनेचा दावा करतील आणि राज्यपाल त्यांस सत्तास्थापनेचे निमंत्रण देतील. मग शपथविधी. सरकारस्थापनेची ही रीत झाली. ती मोडून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शपथविधी कधी, कोठे होणार हे परस्पर सांगून टाकले. त्यांना हे करण्याचा अधिकार काय, कोणी दिला आणि यापुढे विजयी पक्षाचा प्रदेशाध्यक्ष शपथविधीचे निर्णय घेणार किंवा काय, असे काही प्रश्न यातून उपस्थित होतात. ते विचारणार कोणास आणि त्याची उत्तरे देणार कोण! कारण अलीकडे सगळ्यांनी व्यवस्थेचे नेसूचे सोडून डोक्यास गुंडाळायचे असे ठरवलेले असल्याने हे असले वैधानिक मुद्दे उपस्थित केलेच जात नाहीत. ज्यांनी याबद्दल कान उपटायला हवेत, ज्यांच्याकडे त्याचे अधिकार आहेत असे राज्यपाल म्हणजे दिव्यच. याला झाकावे आणि त्यास काढावे असे या महामहिमांचे वर्तन. तेव्हा त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार? अपेक्षाभंगाचे दु:ख टाळण्यासाठी अपेक्षाच न ठेवणे हे उत्तम हा धडा गेल्या काही राज्यपालांच्या वर्तनातून मिळालेला असला तरी काही प्रश्न आणि काही परिस्थिती समोर मांडणे गरजेचे. याचे कारण याच राज्यात सुमारे १५ वर्षांपूर्वी निवडणुकांनंतर अशीच परिस्थिती आली असता तत्कालीन राज्यपाल एस. सी. जमीर यांनी काय केले होते याचे स्मरण करून देणे हे कर्तव्य ठरते. त्या वेळी सत्ताकांक्षी काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्यात निवडणुकोत्तर सत्ता वाटप बराच काळ होऊ शकले नाही. कारणे अर्थातच नेहमीची. ङ्गमहत्त्वाच्याफखात्यांवर उभय पक्षांचे दावे आणि ते निकालात काढण्यात पक्षश्रेष्ठींस लागणारा विलंब. त्यामुळे आतासारखीच परिस्थिती तेव्हा निर्माण झाली. निवडणुकीत बहुमत मिळूनही विजेत्यांकडून सत्तास्थापनेसाठी काही हालचाल नाही. अशा वेळी जमीर यांनी राज्यपाल म्हणून जाहीर भूमिका घेतली आणि उभय पक्षांना स्पष्ट इशारा दिला. त्याचा परिणाम झाला. सत्तास्थापन गतीने झाले. हे होऊ शकले कारण त्या वेळी दिल्लीत व्यवस्थेचा आदर करणारे मनमोहन सिंग सरकार होते. त्यांच्याकडून महामहिमांस मौन पाळायला लावणे अवघड नव्हते. पण तसे झाले नाही. राज्यपाल रास्त भूमिका घेऊ शकले. वास्तविक आताच्या परिस्थितीत विद्यामान राज्यपालांनी इतपत धाडस दाखवण्यात हरकत नव्हती. विद्यामान महामहिमांनी असे करावे यासाठी परिस्थिती अगदी योग्य होती. कारण २६ नोव्हेंबरास विधानसभेची मुदत संपली. त्यामुळे त्याच्या आधी नवी विधानसभा अस्तित्वात आल्याचा आदेश काढला गेला. पण परिस्थिती अशी हास्यास्पद की नवी विधानसभा अस्तित्वात तर आली; पण या विधानसभेस कोणी सदस्यच नाहीत. म्हणजे २८८ जण या निवडणुकीत विजयी ठरले खरे; पण यातील कोणाचाही अद्याप शपथविधीच झालेला नाही. अशा वेळी राजभवनातील महामहिमांनी विजयी पक्षांस चार शब्द सुनावणे अगत्याचे होते. ङ्गङ्गतुमचे सत्तास्थापनेचे, खातेवाटपाचे घोळ नंतर निस्तरा आधी नवनिर्वाचितांस आमदारकीची शपथ देणे गरजेचे आहेफफ, असे काही या महामहिमांनी संबंधितांस ऐकवले असते तर त्यांच्याविषयी दोन शब्द बरे बोलण्याची संधी मिळाली असती. पण या राजभवनवासींनी काहीही केले नाही. सर्वाधिक जागा जिंकलेल्या पक्षाचा प्रदेशाध्यक्ष परस्पर शपथविधीची घोषणा कशी काय करू शकतो; याची चाड त्यांना नाही आणि निवडून आलेल्यांस आमदारकीची शपथही देता येत नाही, याची त्यांना खंत नाही. सगळेच लटकले. ते एकवेळ ठीक. पण हे लटकणे महामहिमांनी दूरवरून पाहात बसणे काही ठीक नाही. दुसरा मुद्दा सत्ताधारी भाजपचा. इंग्रजीत ङ्गप्रॉब्लेम ऑफ प्लेन्टीफ असा वाक्प्रचार आहे. म्हणजे हवी ती गोष्ट अति मिळाल्याने होणारी समस्या. भाजपस सध्या ती भेडसावत असावी. या निवडणुकीत आपण सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येऊ याचा अंदाज भाजपस होता. पण हे इतके महाकाय संख्याबळ आपणास मिळेल याची कल्पना बहुधा त्यांनाही नव्हती. त्यामुळे काठावरच्या बहुमतानंतर आवश्यक शस्त्रक्रियांची जय्यत तयारी या पक्षाने केलेली होती. या शस्त्रक्रियांत साम-दाम-दंड-भेद अशा सर्व पर्यायांचा कसा अवलंब केला जातो, घोडेबाजार कसा सजतो आणि फुलतो हे सर्वांनाच माहीत. पण निवडणुकांच्या निकालाने या संभाव्य शस्त्रक्रियांचाही निकाल लागला आणि मुख्यमंत्रीपद, अन्य ङ्गमहत्त्वाचीफ खाती आदी मुद्द्यांवर चर्चेचे गुऱ्हाळ घालत तोडगा काढण्याची वेळ सत्ताधारी पक्षावर आली नाही. त्यामुळे मुख्यमंत्रीपद स्वीकारण्याखेरीज पर्यायही राहिला नाही. ते स्वीकारावे लागले नसते तर काही स्वपक्षीयांचे नाक कापण्याची संधी दिल्लीकरांना मिळाली असती. दिल्लीकरांचा तो आनंदही हुकला. तेव्हा या आनंदास आणि मोठेपणास मुकलेल्या दिल्लीश्वरांनी सरकार स्थापना प्रक्रियेकडे दुर्लक्ष केले. किंवा हवे तितके लक्ष दिले नाही. असे होऊ शकते. कारण केंद्रातील सत्ताधारी पक्ष कोणताही असो. त्या पक्षाच्या दिल्लीश्वरांसाठी आपल्या पक्षाच्या राज्यशाखा आपल्यावर किती अवलंबून आहेत हे अनुभवण्यासारखा दुसरा आनंद नसतो. महाराष्ट्राच्या दणदणीत विजयाने दिल्लीश्वरांचा हा आनंद हिरावून घेतला. त्याची परतफेड राज्यातील नेत्यांचा शपथविधीचा आनंद लांबवण्यात झाली नसेलच असे नाही.

## अपंगाची व्यथा....

सुख भोगण्यास
हवे छान तन
हे अपंगत्वाने
दुःखी कष्टी मन...१

जीवन रहाटी
अंध प्रभा असे
आधार या ठायी
काठीविना नसे...२

व्यंग शरिराला
प्रगतीत बाधा
जीवन चक्रात
एक खोटा वादा...३

अपगंत्वात ह्या
थोडकेच त्यात
असतात जिद्दी
करी त्याला मात...४

**सुरेश शिर्के**

# पेन

बॉल पोइंट पेनचा शोध हा विज्ञान जगतात कुठल्या क्रांतीपेक्षा कमी नव्हता. आज लिहिण्यासाठी आपण ज्या बॉल पेनचा वापर करतो, तो जगातील सर्वाधिक वापरला जाणारा पेन आहे. पण आधीच्या काळी तर शाई किंवा फाउंटन पेन वापरला जायचा.

साधारण १९९० च्या काळात बॉलपेन ज्यांनी वापरले आहेत त्यांनी भरपूर प्रमाणात पेनाच्या रिफील्स वापरल्या असतील. त्यावेळी रिफील्स सरास मिळायच्या एकच पेन खूप खूप वर्ष वापरण्याची संस्कृती होती. परंतु आज काल युज अँड थ्रो ही संस्कृती आली आहे. रिफील्स काही मिळत नाहीत त्याऐवजी नवीन पेनच विकत घेणे आणि त्यातील शाई संपली की एक नवीन पेन वापरण्यात येतो , तो संपला की पुन्हा दुसरा पेन वापरला जातो .अशा प्रकारे वरचेवर नवीन नवीन पेन खरेदी केले जातात आणि प्रत्येक पेनाची किंमत ही कमीत कमी दहा रुपये पासून सुरू होते. आधी एकच पेन असायचा जो दोन ते दहा रुपयांचा असायचा आणि त्याची रिफील एक आठाने किंवा एक रुपया अशी पडायची.

पैशाच्या दृष्टीने सुद्धा पेन हे खर्चिकच झालेले आहेत आणि इतके पेन घरामध्ये आणले जातात की पेनच पेन घरभर पसरलेले दिसतात आणि ते पुन्हा वापरले जात नाहीत. कारण त्यांची रिफील मिळत नाही मग शेवटी काय ते संपलेले पेन आपण कच□याच्या डब्यात टाकतो. एका घरामागे



समजा महिन्याला एक दहा पेन जर एका कचराच्या डब्यात टाकले गेले तर एकूण किती घरे आहेत आणि शेवट काय तर हे पेन कच□याच्या डब्यात टाकले जातात आणि शेवटी काय होतं तर पर्यावरणाचा नाश होतो,पर्यावरणाचा □्हास होतो .पर्यावरण प्रदूषित होतं. या पेनांची पुनरावृत्ती केली जाते पुनर्रचना त्यांची केली जाते . काही ना काही तरी त्यांच्या प्लास्टिक पासून काहीतरी नवनिर्मिती केली जाते असं म्हटलं जातं पण पूर्णतः सर्व प्लास्टिक या पेनचं वापरलं जात नाही आणि जर ते आपण जाळलं तर विषारी वायू निर्मिती होते . हे कुठेतरी आपण थांबवू शकतो.

मला अजूनही आठवतं की माझा साधारण १३ वी १४ वी इयत्तेत वापरलेला पेन माझ्याकडे होता तो पेन मी अगदी माझ्या बी.एड. च्या परीक्षेत सुद्धा वापरला आणि तो माझ्याकडे माझ्या वहीमध्ये तसाच होता. एकदा जेव्हा मी माझे जूने सामान काढलं तेव्हा तो पेन मला मिळाला मी माझ्या मुलाला तो दाखवला होता आणि त्या पेनाने माझ्या मुलाने सुद्धा लिहिलं होतं. इतक्या छान क्वालिटीची रिफील त्यावेळी बनत होत्या आणि त्यामुळे आमचा एवढा पेनावरती खर्च होत नव्हता.

माझ्या मते एक पेन माणसाला कमीत कमी चार पाच अगदी सहा वर्ष जाऊ शकतो फक्त त्याच्या रिफील्स उपलब्ध झाल्या पाहिजेत. अशा प्रकारे आपण पर्यावरण प्रदूषण रोखू शकतो.

योगिता संदीप जाधव
सानपाडा , नवी मुंबई

# येथील बँकिंग यंत्रणा कात टाकतेय

वशिल्याने दिली जाणारी कर्जे, सरकारी हस्तक्षेप आणि वसुलीकडे होणारे दुर्लक्ष यामुळे बँका सतत तोट्यात असायच्या. मात्र बँकिंग सुधारणा राबवल्यापासून राष्ट्रीयीकृत बँकांच्या कारभाराची शैली हळूहळू बदलू लागली. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी उत्तम कामगिरी करत निव्वळ नफ्यामध्ये २६ टक्के वृद्धी नोंदवली. त्यांच्या व्यवसायात लक्षणीय वाढ, तर बुडीत कर्जांमध्ये घट झाली आहे. राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर प्रचंड शाखाविस्तार होऊन गोरगरिबांपर्यंत पोहोचल्या; परंतु त्यानंतर वशिलेबाजीने दिली जाणारी कर्जे, सरकारी हस्तक्षेप आणि वसुलीकडे होणारे दुर्लक्ष यामुळे बँका सातत्याने तोट्यात जाऊ लागल्या. डॉ. मनमोहन सिंग यांनी बँकिंग सुधारणा राबवल्यापासून राष्ट्रीयीकृत बँकांच्या कारभाराची शैली हळूहळू बदलू लागली. विद्यमान केंद्र सरकारनेही काही उपाययोजना केल्या आणि सरकारी बँकांच्या कारभारात हळूहळू फरक दिसू लागला. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी उत्तम कामगिरी केली आहे. या बँकांनी निव्वळ नफ्यात २६ टक्के वृद्धी नोंदवली आहे. त्याचबरोबर बँकांच्या व्यवसायात लक्षणीय वाढ झाली असून, बुडीत कर्जांमध्ये घट झाली आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या सहा महिन्यांमध्ये १२ राष्ट्रीयीकृत बँकांचा २३६ लाख कोटी रुपयांचा एकूण व्यवसाय झाला. गेल्या वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत त्यात ११ टक्के वाढ झाली आहे. पहिल्या सहामाहीमध्ये बँकांच्या कर्जवितरण व ठेवींमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत बारा टक्के आणि साडेनऊ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. बँकांचे कर्जवितरण १०२ लाख कोटी रुपये असून ठेवी १३३ लाख कोटी रुपयांच्या आहेत, अशी माहिती केंद्रीय अर्थखात्याने दिली आहे. बँकिंग क्षेत्रात वेगवेगळ्या मूलभूत सुधारणा राबवण्यात आल्यामुळे त्याचप्रमाणे नादारी-दिवाळखोरीविषयक कायदा करून प्रभावीपणे अमलातही आणला जाऊ लागला. त्याचप्रमाणे कर्जवितरणात शिस्त आणण्यात आली आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येऊ लागला. त्याचे काही चांगले परिणाम दिसू लागले. या पार्श्वभूमीवर, आता रिझर्व्ह बँकेने खासगी बँकांबाबतही काही उपाय अमलात आणले आहेत. भारतीय स्टेट बँक, एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँक यांचे डोमेस्टिक सिस्टिमॅटिकली इम्पॉर्टंट बँक दर्जा कायम ठेवण्यात आला आहे. २०२३ मध्ये त्यांचा हाच दर्जा होता. तो आता तसाच कायम ठेवण्यात आला आहे. या एसआयबी म्हणजे अशा बँका, ज्यांचा आकार इतका मोठा असतो की, त्या कोसळूच शकत नाहीत! तसेच अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने त्यांची बँकिंग सेवा अत्यंत मोलाची असते २०१४ मध्ये रिझर्व्ह बँकेने ही पद्धत सुरू केली. त्याच्या पुढच्या वर्षीपासून अशा बँकांची नावे जाहीर करण्यात येऊ लागली. पहिली दोन वर्षे एसबीआय आणि आयसीआयसीआय बँक यांना हा दर्जा होता. २०१७ मध्ये त्यात या बँकांबरोबरच एचडीएफसीचा समावेश करण्यात आला. काही बँका विशाल असतात आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत असतात. तसेच त्या अस्ताव्यस्त पसरलेल्या असतात. त्यांना दुसरा पर्यायदेखील नसतो. त्यांच्या शाखा अनेक असतात. त्या आधुनिक तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर करत असतात. या प्रकारच्या बँका या अखंडितपणे आवश्यक त्या बँकिंग सेवा पुरवत असतात. उद्या अशा बँका अडचणीत आल्यास सरकारची सर्व प्रकारची मदत मिळेल, केंद्र सरकार त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहील, याची खात्री असते. बँकांच्या महत्त्वानुसार गुण दिले जातात आणि त्यानुसार वेगवेगळ्या बकेट वितरित केल्या जातात. एसबीआय ही बकेट-चार, एचडीएफसीला बकेट-तीन आणि आयसीआयसीआय बँकेला बकेट-एक देण्यात आली आहे. त्या त्या बकेटनुसार त्या बँकेला अतिरिक्त भांडवल उभारावे लागते. जोखीम मालमत्तांच्या ०.२० ते ०.८० टक्के इतके अतिरिक्त भांडवल उपलब्ध करावे लागते. एसबीआयला ०.८० टक्के, एचडीएफसीला ०.४० टक्के आणि आयसीआयसी बँकेला ०.२० टक्के अतिरिक्त भांडवलाची गरज आहे. भारतात शाखा असलेल्या ज्या परदेशी बँकांनाही ग्लोबल सिस्टिमॅटिकली इम्पॉर्टंट बँकेचा दर्जा मिळू शकतो. त्यानुसार अशा बंकांनादेखील भांडवली अधिभार द्यावा लागतो. म्हणजे जादा भांडवल उपलब्ध करून द्यावे लागते. जेवढे भांडवल अधिक, तेवढी कर्ज देण्याची क्षमता जास्त. भारतात सोने, कार गहाण ठेवून कर्ज घेणारे लोक ज्याप्रमाणे आहेत, त्याचप्रमाणे कोणतीही वस्तू तारण न ठेवता, विनातारण कर्ज घेणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. क्रेडिट कार्डवर विनातारण कर्जे घेतली जातात. तसेच ईएमआयवर केलेली खरेदी अशाच प्रकारच्या कर्जातून केली जाते. बिगरबँकिंग मायक्रोफायनान्स क्रेडिट कार्ड, स्मॉल फायनान्स बँक, फिनटेक कंपन्या, सार्वजनिक आणि खासगी बँका या विनातारण कर्ज देऊ लागल्या आहेत, तेही मोठ्या प्रमाणात! मागील दोन वर्षांमध्ये विनातारण लहान-लहान कर्जांच्या वाटपांच्या प्रमाणात २३ टक्क्यांची भर पडली आहे. २०१७ मध्ये विनातारण कर्जांचा भाग साडेचार लाख कोटी रुपये होता. हे प्रमाण आता १५ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. रिझर्व्ह बँकेने असुरक्षित कर्ज देण्यावर आणलेल्या बंधनांमुळे बँका आणि बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांना (एनबीएफसीएस) सोने कर्जासारख्या सुरक्षित कर्ज उत्पादनांवर लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडले आहे. गेल्या एका वर्षांत सोन्याच्या किमतीत जवळपास २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे आणि कर्जदारांनी ङ्गडिजिटल ऑन-बोर्डिंगफ पायऱ्या वाढवल्यामुळे जून २०२४ मध्ये संपलेल्या १२ महिन्यांमध्ये सोन्याच्या कर्जात वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेकडील डेटा आणि ङ्गएनबीएफसीफच्या त्रैमासिक अहवालांवरून दिसून आले आहे की गेल्या एका वर्षात थकित सोन्याच्या कर्जात २०- ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या विभागामध्ये ङ्गएनबीएफसीफचे वर्चस्व असतानाही एकट्या अनुसूचित व्यावसायिक बँकांनी जून २०२४ पर्यंत एक लाख २३ हजार ७७६ कोटी रुपयांची थकबाकी असलेल्या सुवर्ण कर्जामध्ये वार्षिक ३० टक्के वाढ पाहिली आहे. याउलट सुवर्ण कर्ज, असुरक्षित क्रेडिटमध्ये मंद वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार जून २०२३ मध्ये ३० टक्के वार्षिक वाढीच्या तुलनेत जून २०२४ मध्ये ङ्गइतर वैयक्तिक कर्जफ अंतर्गत थकबाकीची रक्कम १५ टक्क्यांनी वाढली. थकित सोन्याच्या कर्जाच्या महिन्या-दर-महिन्याच्या विश्लेषणात दिसून आले आहे की, आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये वाढ विशेषतः तीव्र होती. कारण मे २०२४ मध्ये थकीत रकमेत १५ टक्क्यांनी वाढ झाली होती. त्याचप्रमाणे, ङ्गएनबीएफसीफच्या बाबतीत, सर्वात मोठ्या गोल्ड फायनान्सर मुथूट फायनान्सने जून २०२४ मध्ये गोल्ड लोन ॲसेट्स अंडर मॅनेजमेंट (एयूएम)मध्ये २३ टक्के वाढ नोंदवली आहे. जून २०२४ च्या तिमाहीमध्ये सर्वात जास्त सोने कर्जवाटप झाले आहे. मणप्पुरम फायनान्सने गोल्ड लोन ङ्गएयूएमफमध्ये वार्षिक १५ टक्के वाढ (२३ हजार ६४७ कोटींवर) दिसली तर ङ्गश्रीराम फायनान्सफने देखील ङ्गगोल्ड लोन एयूएमफमध्ये २३ टक्क्यांची सहा हजार १२३ कोटी रुपये वाढ दिसली. विनातारण कर्जांवर व्याजदर जास्त असतात आणि त्यांचा ईएमआयदेखील घसघशीत असतो. मात्र बँका अथवा वित्तसंस्थांनी सारासार विचार न करता अशी भरमसाट कर्जे देण्यास सुरुवात केल्यास आरोग्य धोक्यात येऊ शकते. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने त्याबाबत काही कठोर नियम केले आहेत. छोटी कर्जे देणाऱ्या बँका आणि वित्तसंस्थांची जोखीम भांडवलाची पर्याप्तता वाढवणे, काही कंपन्यांना नवीन कर्ज देण्यास मनाई करणे अशी पावले रिझर्व्ह बँकेने उचलली असून, ती स्वागतार्हच म्हणावी लागतील. गोरगरिबांना त्यांच्या गरजा भागवण्यासाठी सूक्ष्म कर्जे देणे आवश्यक असते. ही कर्जे न मिळाल्यास ग्राहक सावकारांकडे जाऊन कर्ज सापळ्यात अडकण्याची शक्यता असते; परंतु तरीदेखील ही कर्जे दैनंदिन खर्च भागवण्यासाठी घेण्यात आल्यास गरिबांची तात्पुरती गरज भागेल; परंतु या सूक्ष्म कर्जातून गोरगरिबांच्या व्यवसाय- उद्योगाची गरज भागत असल्यास आणि त्यातून उत्पादकता निर्माण होणार असल्यास, ते अधिक हिताचे ठरते. त्यामुळे सवंग दृष्टिकोन धारण न करता, समतोल दृष्टिकोनातून या विषयाकडे पाहण्याची गरज आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ५ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## मुळशीच्या पैलवानावर काळाचा घाला, ८ दिवसांवर लग्न असताना नियतीचा अमानुष खेळ





**प्रतिनिधी**

जिममध्ये व्यायाम करत असताना हृदयविकाराचा झटका आल्याने पैलवानाचा मृत्यू झाला आहे. पुण्यातल्या मुळशी तालुक्यातील माण येथे ही घटना घडली. पैलवान विक्रम पारखी असं आकस्मित मृत्यू झालेल्या पैलवानाचे नाव आहे. राष्ट्रीय खेळाडू पैलवान विक्रम पारखी यांचे आकस्मिक निधन झाल्याने माणसह मुळशीवर शोककळा पसरली आहे. पैलवान विक्रम पारखी याचे येत्या १२ डिसेंबरला लग्न होणार होते. मात्र काळाने त्याआधीच झडप घालून विक्रमचा मृत्यू झाल्याने पारखी कुटुंबावर आनंदा ऐवजी दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विक्रम याने अनेक राष्ट्रीय पदकं आणि किताब मिळवले आहेत. विक्रमने आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला होता. मुळशीच्या माण येथील राष्ट्रीय खेळाडू कुमार महाराष्ट्र केसरी पैलवान विक्रम पारखी याचे आज सकाळी जिममध्ये व्यायाम करताना आकस्मिक निधन झाले. पैलवान विक्रम याला हृदयविकाराचा झटका आला. त्यामध्ये त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेने संपूर्ण माणगावसह मुळशी तालुक्यावर आणि कुस्ती क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. पैलवान विक्रम पारखी याचे येत्या १२ डिसेंबरला लग्न होणार होते, मात्र काळाने त्याआधीच झडप घालून विक्रम ह्याला हिरावल्याने पारखी कुटुंबावर आनंदा ऐवजी दुःखाचा डोंगर कोसळलाय. पारखी कुटुंबावर कोसळलेल्या दुःखामुळे मुळशी तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

# आ. राम शिंदे यांना मंत्रिमंडळात घ्या

**खर्डा प्रतिनिधी**

खर्डाः कर्जत जामखेड तालुक्यात आमदार राम शिंदे यांना मानणारे असंख्य भाजपचे कार्यकर्ते आहेत. आताच्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या मताधिक्य नुसार समजून येते, राम शिंदे यांच्या माध्यमातून कर्जत व जामखेड तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात विकास कामे भरपूर प्रमणात झाली आहेत. या बाबतीत खर्डा व परिसरातील देखील अतिशय महत्त्वाचे असे कामे म्हणजे खर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, खर्डा बस स्टॅण्ड, अनेक ठिकाणी बंधारे, कितेक वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असलेले अमृत लिंग तलावाचे काम नविन निधी उपलब्ध करून पुर्ण केले. हजारो एकर शेती ओलिताखाली आली अनेक शेतकरी समाधानी झाले. प्राथमिक आरोग्य केंद्रे सर्व सुविधा सहीत आज कार्यान्वित झाले या मुळे खर्डा शहरा भोवती अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर मराठवाडा हद्द सुरू होते खर्डा शहरात प्राथमिक आरोग्य केंद्र झाल्याने मराठवाड्यातील पेशंट देखील उपचार घेतात. जलयुक्त शिवार योजनेचा अनेक शेतक–यांना याचा फायदा झाला खर्डा बस स्थानकातून रोज शंभर ते दोनशे बस ये या करतात, खर्डा पोलिस स्टेशन मंजूर केले या मुळे गुन्हेगारीला फार मोठा आळा बसला राम शिंदे प्रत्येक ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे केली, खर्डा भागातील सर्वांचे श्रध्दा स्थान सिताराम गड, श्री संत गिते बाबा समाधी स्थळ, मोहरी येथील जगदंबा मंदिर सभामंडप व रस्ता या साठी फार मोठा निधी उपलब्ध दिला व कामही पूर्ण केले ग्रामीण भागातील जनतेचा दैनंदिन जीवनातील प्रश्न मार्गी लावले. त्यामुळे सर्व सामान्य जनता व भाजप पदाधिकारी अशा निष्ठावंत आमदार राम शिंदे यांना या नविन महायुतीच्या मंत्रीमंडळात घेण्याची जोरदार मागणी केली आहे भाजपा नेते रवि सुरवसे, खर्डा ग्रामपंचायत सरपंच संजीवनी पाटील, माजी सरपंच संजय गोपाळघरे, भाजपा चे यूवानेते बाजीराव गोपाळघरे मार्केट कमिटी सदस्य वैजिनाथ पाटील ग्रामपंचायत सदस्य महेश दिंडोरे, राजू मोरे, गणेश शिंदे इत्यादी ने निवेदन डरे मागणी केली आहे

# द.बा. घुमरे स्कूलच्या तनुजा हाडुळे हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

पाटोदा प्रतिनिधी :–

/ द. बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड च्या तनुजा हाडुळे या विद्यार्थिनीची राष्ट्रीय नेट बॉल स्पर्धे साठी निवड झाली असून तनुजा हि राज्य स्तरीय स्पर्धेत नागपूर येथे खेळली असून तिची राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड झाल्या बद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत आहे तमिळनाडू येथे २८ ते ३० डिसेम्बर पर्यंत मॅच चालणार असून भंडारा या ठिकाणी ५ दिवस कॅम्प होणार असून तेथुन तामिळनाडू साठी टीम रवाना होणार आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक सचिव दिपक घुमरे, प्राचार्य एम आर शेंडगे, क्रीडा प्रशिक्षक गिरी विशाल

तसेच जिल्हा असोसिएशन नेट बॉल चे चेअरमन रामदास गिरी तसेच शाळेतील शिक्षक वृन्द अशोक सानप, देवढे, संभाजी पवार, गाऊ अडागळे, आर जे इंगोले, जाधव सर, हावळे सर, गव्हाणे सर जगताप सर, डावकर सर, शिंगटे सर यांनी अभिनंदन केले आहे व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या..



# मराठा आरक्षण योद्धा तानाजी सावंत यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यावे जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांची मागणी

बीड प्रतिनिधी मराठा आरक्षणाचे खरे योद्धा आमदार तानाजी सावंत यांना महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्र्यांनी ग्रामविकास अथवा महसूल खात्याचे कॅबिनेट मंत्री करून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी द्यावी. त्यांना सदरील खाते देऊन महाराष्ट्रातील तमाम मराठा समाजाला न्याय द्यावा अशी जाहीर मागणी जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी केली आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेचे धाराशिव जिल्ह्यातील भूम परांडा मतदार संघाचे तरुण तडफदार आमदार तानाजी सावंत हे मराठा समाजाचे खरे शिलेदार आहेत.लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या समवेत मराठा आरक्षणासाठी ते मेटे साहेबाप्रमाणे उघड पणे भूमिका घेऊन मराठा समाजासाठी सत्तेत असताना सुद्धा सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत होते. गरजवंत मराठ्यांना ओबीसी मधून आरक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची प्रमुख भूमिका होती आणि ठामपणे आहे. आपल्या भूमिकेसोबत ते कधीही परिस्थितीनुसार प्रसंगानुसार स्वतःच्या स्वार्थासाठी बदलणारे नेतृत्व नाहीत. मराठा समाजाच्या पाठीशी कायम उघड भूमिका घेऊन ठाम पाठीशी राहणारे महाराष्ट्रातील एकमेव विधिमंडळातील नेतृत्व म्हणजेच तानाजी सावंत आहेत.तानाजी सावंत यांनी इतर कोणत्याही समाजावर अन्याय केला नाही. सर्व समाजाला न्याय देणारे आणि मराठा समाजासाठी उघडपणे भूमिका घेणारे नेतृत्व आहे. एवढेच नव्हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्रात अनेकांनी निराश होऊन आत्महत्या केल्या. त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना तानाजी सावंत यांनी कुटुंबप्रमुख प्रमाणे मायेची सावली त्या कुटुंबीयाच्या पाठीशी उभी केली. आत्महत्याग्रस्त कुटुंब या दुःखातून बाहेर पडावे यासाठी सरकारच्या तिजोरीतून जी काही मदत जास्तीत जास्त करता येईल त्यासाठी



तर प्रयत्न केलेच याशिवाय स्वतः व्यक्तिगत महाराष्ट्रातील ज्या तरुणांनी मराठा आरक्षण समर्थकांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्या अशा कुटुंबीयांपैकी ३७ कुटुंबीयांना त्यांनी स्वतः व्यक्तिगत प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत दिली. असे दायित्व आणि दातृत्व असलेल्या नेतृत्व महाराष्ट्रात एकमेव आमदार तानाजी सावंत आहेत यात शंका नाही. त्यामुळेच जय शिवसंग्रामने त्यांना विधानसभा निवडणुकीत जाहीर पाठिंबा देऊन त्यांना निवडून आणण्यामध्ये प्रमुख भूमिका घेत प्रचाराची धुरा जय शिवसंग्रामने सांभाळली होती. महाराष्ट्रामध्ये महायुतीचे सरकार आणि काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेचे सर्वाधिक आमदार निवडून यावेत यासाठी त्यांनी इतर मतदारसंघात सुद्धा जाऊन स्टार प्रचारक प्रमाणे भूमिका बजावली. ते उत्कृष्ट संघटक असून समाजबांधणी करण्यामध्ये त्यांचा मोठा हातकंठा आहे. त्यामुळे अशा नेतृत्वाला महायुतीच्या सरकारमध्ये कॅबिनेटमध्ये सर्व समाज घटकांचे कल्याण करण्यासारखे ग्रामविकास खाते किंवा महसूल खाते त्यांच्याकडे देऊन या महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अशा लोकप्रिय कणखर नेतृत्वाला संधी द्यावी अशी जाहीर मागणी जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी केली आहे.

# राज्यातून थंडी गायब



पुणे : राज्यामध्ये मंगळवारी (दि. ३) ढगाळ वातावरण तयार झाल्याने उष्णता जाणवत होती. परिणामी पावसासाठी पोषक हवामान झाले. ब–याच जिल्ह्यातील किमान तापमान १७ ते २१ अंशावर नोंदवले गेल्याने थंडी गायब झाली. हवामान विभागाने बुधवारी (दि.४) सिंधुदूर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यामध्ये काही भागांमध्ये विजांसह हलक्या पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. तर रत्नागिरी, सातारा, पुणे, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, लातूर आणि नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज वर्तविला. तसेच गुरुवारी (दि.५) सिंधुदूर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी विजांसह हलक्या पावसाचा यलो अलर्ट जारी केला. तर शुक्रवारी (दि.६) कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यामध्ये काही भागात विजांसह हलक्या पावसाचा यलो अलर्ट दिला

## शाळेतून आल्यावर तो गप्प-गप्प, आईने जवळ घेताच फुटला बांध ! स्पेलिंग आलं नाही म्हणून ७ वर्षांच्या चिमुकल्याला:

**प्रतिनिधी**

एका इंग्रजी शब्दाचं स्पेलिंग आलं नाही म्हणून निर्दयी शिक्षिकेने अवघ्या ७ वर्षांच्या मुलाला काठीने अमानुष मारहाण केल्याची अत्यंत भयानक आणि तेवढीच संतापनजनक घटना अंबरनाथमधील शाळेत घडली आहे. त्या शिक्षिकेने चिमुकल्या मुलाच्या पाठीवर आणि पायावर काठीने सपासप फटके दिले. ही घटना उघडकीस आल्यावर संतापाची लाट उसळली असून त्या निर्दयी शिक्षिकेविराधोत अंबरनाथ पश्चिम पोलिस स्टेशमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला जेलची हवा खावी लागणार आहे.

नेमकं झालं तरी काय ?

अंबरनाथ शहरातील पश्चिमेला असणा– साऊथ इंडियान शाळेत लहान मुलाला बेदम मारहाण केल्याचा हा अमानुष प्रकार घडला आहे. पीडित मुलगा अवघ्या ७ वर्षांचा असून तो या शाळेत दुस–या इयत्तेत शिकत आहे. घटनेच्या दिवशी त्या विद्यार्थ्याला त्याची वर्गशिक्षिका विजयश्री शकेवार हिने एका शब्दाचं स्पेलिंग विचारलं. मात्र त्या मुलाला काही ते स्पेलिंग सांगता आलं नाही, त्याचं ते स्पेलिंग चुकलं. ते पाहून चिडलेली शिक्षिका विजयश्री हिने काठी घेऊन त्या चिमुरड्या मुलाच्या पाठीवर आणि पायावर सपासप फटके दिले, त्याला अमानुष मारहाण केली.

# विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहू-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये संत सावता महाराज मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

प्रतिनिधी बीड

दि.४ : नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपण विकासाचे व्हिजन मांडले होते. महायुती सरकारच्या माध्यमातून आपण विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहणार आहे, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीडमध्ये संत सावता महाराज मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन बुधवारी (दि.४) करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नागरिक नामदेवराव दुधाळ, माजी नगरसेवक बाबूराव दुधाळ, नितीन साखरे, शुभम धूत, बिभीषण लांडगे, मोहनराव गोरे, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, रमेश दुधाळ, राजेंद्र शेलकर, राजेश साळुंके, गोरख यादव, संतराम पानखेडे, दिलीप बेदरे, मयुर आखाडे, मनोज काळे, निलेश घाडगे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश



क्षीरसागर म्हणाले, शहरातील सावता माळी चौक परिसरातील बिंदूसरा नदीकाठेला संत सावता महाराजांचे भव्य मंदिर निर्माण केले जात आहे. या मंदिरासमोरील सभागृहासाठी मी व माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांनी यापूर्वी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. याठिकाणी लोकवर्गणीतून ४० लक्ष रुपयांचे मंदिर उभारले आहे. आपण मंदिर, सभागृह व परिसर विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हे काम अंतिम टप्यात असून मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी आता २० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या मंदिराचे काम पूर्णत्वास जात असून लवकरच प्राणप्रतिष्ठापणा सोहळा आयोजित केला जाणार आहे. या धार्मिक कार्यात आपला खारीचा वाटा असल्याचे मनाला समाधान वाटते, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या तरूणाईत प्रतिकुलतेला अनुकूल परिस्थिती करण्याची क्षमता -आदित्य जीवने



## दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**बीड, दिनांक ०३ : बीडच्या युवांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. प्रतिकुल परिस्थितीतही ते अनुकुल परिस्थिती निर्माण करू शकतात. या क्षमतेचा, कलागुणांचा युवकांना त्यांच्या जीवनात फायदा होतोच. युवा महोत्सवातून अशा गुणवत्ता, क्षमतेला वाव मिळतो. त्यातूनच उज्ज्वल देश घडण्यासाठी मदत होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले. जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजन यांच्यावतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. जीवने बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रपती पुरस्कारार्थी डॉ.सतीश साळुंखे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे.पी.शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, राज्य तायक्वाँदो असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश बारगजे, राज्य युवक पुरस्कारार्थी तत्वशील कांबळे, ज्येष्ठ क्रीडा संघटक दिनकर थोरात, साने गुरूजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रीमती डॉ. कविता कराड आदींची उपस्थिती होती.**

**युवा महोत्सवात सहभागी स्पर्धकांच्या कलागुणांना परीक्षकांनी योग्य वाव द्यावा. राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत होण्यासाठी युवांमध्ये प्रेरणा निर्माण करावी, असे आवाहनही श्री. जीवने यांनी यावेळी केले.**

**जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा इतिहास व विकास यावर उपस्थितांना श्री. शेळके, डॉ.साळुंके यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय एकात्मतेचे बीज रूजविण्यासाठी युवा महोत्सव अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात, असेही त्यांनी भाषणातून सांगितले. प्रास्ताविक श्री. विद्यागर यांनी केले. यामध्ये त्यांनी शासनाचा युवा महोत्सवामागील उद्देश आणि दोन दिवसांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा याबाबत सविस्तर माहिती दिली. सुरूवातीला नटराज मूर्तीचे पूजन, त्यानंतर दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. साक्षी कराड आणि काव्या डोंगरे यांच्या नृत्य कलेने कार्यक्रमाचा समारोप झाला. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले.**

**स्पर्धेचे परीक्षक म्हणून अरूण दैतकार, दीपक जमदाडे, विलास सोनवणे, राम गव्हाणे, डॉ. केशव भागवत, संतोष मस्के, प्रा. श्रीकांत पुरी, राधाकृष्ण वाघ, सुमित गायकवाड, लक्ष्मीकांत दोडके, डॉ. संजय कांबळे, रोहिणी धारमोडे, पूनम वोहरी, संदीप परदेशी, राजेंद्र इंगळे काम पाहणार आहेत. त्यांचाही यावेळी आयोजकांच्यावतीने पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.**

**महोत्सव यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, रेवननाथ शेलार, सतीश राठोड, अविनाशा पाटील, कार्यालय अधीक्षक धनेश करांडे, त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद आराक, सचिन जाधव , किशोर काळे , मंगेश वडमारे, राजेश बागलाने आदी पुढाकार घेत आहेत.**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ५ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# परीक्षे आधीच पेपर फुटला?, शिंदेंच्या संभाव्य मंत्र्यांची यादी समोर!

## मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांसोबत अन्य किती जण मंत्रिपदाची शपथ घेणार? याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे

**प्रतिनिधी**

उद्या नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानावर देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यापूर्वी आज महायुतीच्या गोटात घडामोडींना वेग आला आहे. आज भाजपकडून पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली आहे. त्यानंतर महायुतीमधील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी राज्यपालांकडे जाऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांना यावेळी देण्यात आलं. उद्या सायंकाळी पाच वाजेचा वेळ राज्यपालांकडून शपथविधीसाठी देण्यात आला आहे.



दरम्यान देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत, या सरकारमध्ये देखील जुनाच पॅटर्न कायम राहणार असून राज्यात एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एक उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार शपथ घेणार आहेत. मात्र एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार की नाही हे अजूनही गुलदस्त्यात आहे. समोर येत असलेल्या माहितीप्रमाणे एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदासाठी आग्रही आहेत, मात्र दुसरीकडे गृहमंत्रिपद सोडण्यास भाजप देखील तयार नाही. त्यामुळे उद्या एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार की नाही? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

उद्या मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांसोबतच काही मंत्री देखील शपथ घेणार आहेत. मात्र उद्या कोण–कोण शपथ घेणार हे मात्र अजूनही समोर आलेलं नाही, परंतु दुसरीकडे एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार की नाही स्विकारणार हे अद्याप अस्पष्ट असताना शिवसेनेच्या संभाव्य मंत्र्याची यादी समोर आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिवसेनेकडून उदय सामंत, शंभूराज देसाई , गुलाबराव पाटील व दादा भुसे यांना पुन्हा मंत्रिपद मिळण्याची शक्यात आहे.

# जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांच्या हस्ते उदघाटन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्हा रुग्णालयात बुधवार दि.४–डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम दिन राबविण्यात आला.या मोहिमेचे उदघाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक



डॉ. एस.एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आर.एस बुट्टे, डॉ. एच.के. साखरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पुष्पा गायकवाड यांची उपस्थिती होती. या म ोहिमेच्या माध्यमांतून जंताच्या प्रादुर्भावामुळे आरोग्यावर काय परिणाम होतात याविषयी सर्व मान्यवर अधिकारी व श्रीमती डी.ए. गुंडाळे, आर.के.एस.समुपदेशक व सम न्वयक यांनी माहिती दिली.

१ ते २ वर्षातील बालकांना अर्धी गोळी व २ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळी खाऊ घालण्यात आली. आज गैरहजर असलेल्या बालकांना १०–डिसेंबर २०२४ रोजी मॉप अप दिनी जंतनाशक गोळया देण्यात येणार आहे.तरी सर्व बालकांनी जंतनाशक गोळी खावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांनी केले आहे.

# बीजेपी आया, मुंबई अभी मारवाडी का? मुजोर व्यापा–याला मनसेनं चोप

अभी बीजेपी आया है, तो अभी मराठी में नहीं तो मारवाडी में बात करने का:. हे शब्द आहेत मुंबईतल्या एका व्यापारीचे. भाजपचे आमदार मंगलप्रभात लोढांच्या मलबार



हिलमध्ये घडलेल्या या घटनेनंतर संबंधित व्यक्तीला मनसेनं प्रसाद दिला. आधी मग्रुरी केल्यानंतर आपण असं बोललो त्याबद्दल माफी मागतो हे चोप मिळाल्यानंतर व्यापा–याच्या ध्यानी आलं. भाजपनं महाराष्ट्र निवडणुकीत बटेंगे तो कटेंगेचा नारा देत एकजुटीचा संदेश दिला होता. मात्र त्याच मंगलप्रभात लोढांच्या मतदारसंघात एका व्यापा–यानं आपल्याला म राठी आणि मारवाडीत वाटल्याची खंत महिलेनं व्यक्त केली.

# तुम्हाला मतदान केलं, आता माझ्या लग्नाचं बघा - तरूणाची अजब विनंती, ऑडिओ व्हायरल

निवडणुकीदरम्यान, प्रचार करताना नेते मंडळी अनेक आश्वासनं देतात. असंच एक आश्वासन परळी विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटाचे राजेसाहेब देशमुख यांनी दिलं होतं. आता निवडणुकीच्या निकालानंतर या आश्वासनासंदर्भात विचारणा करण्यासाठी त्यांचा फोन सतत खणखणत असतो. ङ्ग मी आमदार झालो तर सगळ्या पोरांची लग्न लावून देईन ङ्ग असं आश्वासन राजेसाहेब देशमुख यांनी दिलं होतं. म ात्र या निवडणुकीत परळीतून ते पराभूत झाले. पण तरीही त्यांना अनेक तरूणांचे फोन येत आहेत. त्या तरूणांशी संवाद साधताना देशमुख यांनीही दिलखुलासपण, दिलदारपणे उत्तर दिल्याचं दिसून आलं.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे परळी विधानसभा मतदारसंघाचे पराजित उमेदवार राजेसाहेब देशमुख यांची एक ऑडिओ क्लिप सध्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आगे. मला निवडून दिले तर मी मतदार संघातल्या मुलांचे लग्न लावून देतो असे वक्तव्य राजेसाहेब देशमुख यांनी प्रचारादरम्यान केले होते. त्यानंतर निवडणुकीचा निकाल लागला पण देशमुख यांचा पराभव झाला. मात्र आता एका तरूणाने देशमुख यांना फोन लावत आपली विवाहाची समस्या त्यांच्यासमोर मांडली. त्यांच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप आता सर्वत्र व्हायरल झाली आहे. पण या ऑडिओ क्लिपची मराठी पुष्टी करत नाही..काय झाला संवाद ? ङ्गसाहेब माझ्या लग्नाचं बघा.. तुम्ही म्हणला होतात..अशी एका तरूणाची विनंती करतानाची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली आहे. त्याच्याशी राजेसाहेब देशमुख यांनीही दिलदारपणे संवाद साधत त्याला उत्तर दिलं. आम्ही तुम्हाला मतदान केले आता आमच्या लग्नाचे बघा अशी विनंती एका तरूणाने केली. प्रचारादरम्यान राजेसाहेब देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनाची आठवण त्या तरूणाने त्यांना करून दिली.बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदारसंघात महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे धनंजय मुंडे विरुद्ध महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख असा सामना होता. त्यावेळी प्रचारादरम्यान राजेसाहेब देशमुख यांनी आमदार झालो तर सगळ्या पोरांची लग्न लावून देऊ असं अजंब आश्वासन दिलं होतं, त्यांच्या या विधानाने अनेकांचं लक्ष वेधलं गेलं. मात्र २३ तारखेला लागलेल्या निकालात परळीतून धनंजय मुंडे जिंकले तर राजेसाहेब देशमुख हरले.

निवडणुकीत त्यांचा पराभव झाला तरी त्यांनी दिलेल्या आश्वासनाचा लोकांना विसर पडलेला नसून एका लग्नाळू तरूणाने त्यांना फोन करत आठवण करून दिली. एका तरुणानं राजेसाहेब देशमुख यांना फोन करून माझ्या लग्नाचं काय झालं असा सवाल केला. आम्ही आशेनं तुम्हाला मतदान केलं, आता मी २७ वर्षांचा आहे, म्हातारा झालो की कोण मुलगी देणार असा सवाल करत लग्नाचा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. मात्र त्यावर राजेसाहेब देशमुख यांनीही दिलखुलासपणे उत्तर दिलं. अरे, आमदार झाल्यावर ( लग्नाचं आश्वासन) पूर्ण करणार होतो मी, आता काय (निवडणुकीत) पाडलं मला, आता कशाचं लग्न होतंय ? मिश्कील स्वरात त्यांनी त्या तरूणाला असं उत्तर दिलं. आलो असतो तर कामाला आलो असतो. तुमच्या आशा ठेवा. मी असेपर्यंत आत्महत्या करू नका. चिंता करू नका मी आहे, असा धीरही त्यांनी त्या तरूणाला दिला. या ऑडिोची सगळीकडे चर्चा सुरू आहे. पण या ऑडिओ क्लिपची पुष्टी करत नाही.

# लाडक्या बहिर्णींना महागाईचा झटका जोर से: शेवग्याला मटणाचा भाव, तेलाचे दरही गगनाला

**मुंबई प्रतिनिधी**

सप्टेंबरनंतर राज्यातच नाही तर देशात महागाईने पुन्हा डोकं वर काढलं आहे. भाजपाल्यासह खाद्यतेल, दैनंदिन जीवनातील अनेक वस्तूंचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मुंबईसह राज्यातील अनेक शहरात दर वाढले आहेत. कांद्याचा थोडा बहूत दिलासा मिळत नाही तोच लसणाने गृहिणींच्या नाके नऊ आणले आहे. खाद्यतेलाच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्याने घरचे बजेट सांभाळताना लाडक्या बहिर्णींना मोठी कसरत करावी लागत आहे. या सर्व महागाईत संसाराचा गाडा कसा हाकायचा असा सवाल लाडक्या बहिणी सरकारला विचारत आहेत.**पालेभाज्यांचा दिलासा**

हिवाळ्यामुळे पालेभाज्यांच्या दरात मोठी घसरण झाली आहे. नवी मुंबईतील अझचउ भाजी मार्के टमध्ये हिवाळा सुरू असल्याने पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक वाढली आहे. त्यामुळे पालेभाज्यांच्या किमतींमध्ये ३०% घट झाली आहे सध्या पालेभाज्या प्रति १० रुपये दराने विकल्या



जात आहे. मागील तुलनेत हा दर खूपच कमी आहे.

**लसणाचा भाव वधारला**

नवी मुबंईतील एपीएमसी मार्केटमध्ये लसणाचे भाव वाढले. एपीएमसी बाजारपेठेत सध्या लसणाचे दर ३०० ते ३५० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचले आहेत. गेल्या काही आठवड्यांच्या तुलनेत लसणाच्या दरात प्रति किलो २० रुपयांची वाढ झालेली आहे. व्यार्पायांच्या म्हणण्यांनुसार, सध्या बाजारात लसणाचा पुरवठा कमी असल्यामुळे भाव वाढले आहेत.

**खाद्यतेलाने आणले जेरीस**

फ्तेलाच्या दरवाढीमुळे ग्राहकांची डोकेदुखी वाढली आहे. गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. गणपती उत्सवापासून आतापर्यंत तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. सध्या मार्केटमध्ये सूर्यफूल तेलाचा १५ किलोचा भाव २२८० रुपये, पाम तेलाचा २१८० रुपये, तर सोयाबीन तेलाचा भाव २०५० रुपये आहे. व्यार्पायांच्या मते पाम तेलाच्या दरात तब्बल ३०० रूपयांची वाढ झाली असून, सूर्यफ ूल तेलावर २५% आयात शुल्क लावल्यास दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या तरी सोयाबीन तेलाचे भाव कमी आहे.

**शेवगा ५०० रुपयांवर**

जालना जिल्ह्यात मागील ८ दिवसापासून थंडीचा जोर कायम असल्याने त्याचाच परिणाम आता थेट भाजीपाल्याच्या दरामध्ये झाल्याचं दिसून येत आहे. जालन्यात शेवग्याचा दर पाचशे ते साडेपाचशे रुपये किलो झाला आहे. या दरवाढीमुळे महात्मा फुले भाजी मार्केट मधून शेवगाच गायब झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. बाजारात आवक कमी असल्याने शेवग्याचे दर वाढले आहेत. पुढील एक ते दीड महिना हे भाव स्थिर राहणार असल्याच विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे प्रचंड दर वाढल्याने नागरिकांनी देखील शेवगा खरेदीकडे पाठ फिरवली आहे. .मागील ५ ते ६ दिवसांपासून ग्रामीण भागातल्या आठवडी बाजारात तुरळक ठिकाणी शेवगा दिसून येत आहे. .दरम्यान जालन्यात पहिल्यांदाच शेवग्याला विक्रमी ५०० ते साडेपाचशे रुपयांचा भाव मिळत असल्याने आजवर दरामध्ये झालेली सर्वात मोठी वाढ आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com